# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/१०/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## घरफोडीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

**पोस्टे काटोल:—** पोस्टे काटोल येथील स्टाफ रात्रगस्त करीत असतांना दि. २१/१०/२०२४ चे ०२.३० वा. ते ०३.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— विपीन विनायक सरोदे वय ४५ रा. अरविंद बॅक समोर काटोल जि. नागपुर याचा फोन आला की, त्याचे दुकानात चोर घुसले आहे त्यावरून सदरची माहिती मिळताच काटोल पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले असता त्यांना दोन इसम दुकाणाच्या शटरचे कुलुप तोडुन आत दुकाणात प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न करत असताना मिळुन आले. त्यापैकी एक आरोपी नामे १) शेख वकिल शेख करिम रा. यशोधसरा नगर नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीला विचारपुस केली असता त्याचे सोबत आरोपी क्र. २) मोहम्मद ईरफान रा. नविन वस्ती नागपुर पाचपावली नागपुर हा घटनास्थळी हजर होता परंतु तो पोलीसांना पाहुन पळुन गेला. काटोल पोलीस फरार आरोपीचा शोध घेत आहे. आरोपी क्र. १ याचेवर यापुर्वी देखील नागपूर शहर येथील पोस्टे लकडगंज, पाचपावली, यशोधरा नगर येथे मालमत्तेविरूद्ध गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून आरोपीतांविरूद्ध पोस्टे काटोल येथे कलम ३३१(४), ३०५(अ), ६२, ३(५)बी एन एस अन्वये गुन्हा नोंद केला असुन यातील आरोपी क्र. १ यास अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि शिवाजी नागवे मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापु रोहोम यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोनि निशांत मेश्राम, स्टाफ भूषण मदनकर, पवन वाघमारे यांनी पार पाडली.

<u>अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई</u>

दिनांक १९/१०/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय बातमीदारा कडून माहिती मिळाली की, सावनेर हद्दीतील मौजा अदासा ते धापेवाडा रोड वरील उमंग बार ॲन्ड रेस्टॉरेंट अदासा येथे एक्स यु व्ही ३०० महींन्द्रा चार चाकी कार क्र एम. एच.– ४०/सि. एस–४५०४ ने अवैध विदेशी दारूची वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीचे आधारे नाकाबंदी केली असता **आरोपी नामे–१) भालचंद्र बाबुराव भगत वय ५२ वर्ष रा वार्ड क्र १२ राममंदिर रोड, सावनेर २) अंकित रा परसोडी सावनेर जि. नागपुर** यांच्या ताब्यातून अवैधरीत्या विनापरवाना १) रॉयल स्टॅग विदेशी दारू च्या १२० निपा प्रत्येकी १८० एम.एल.. प्रत्येकी १९० रू प्रमाणे एकुण किंमती २२८००/–रू २) रॉयल ग्रिन विदेशी दारू च्या ३० निपा प्रत्येकी १८० एम. एल प्रत्येकी २०० रू प्रमाणे एकुण कि ६०००/– रू ३) एक्स यु व्ही ३०० महींन्द्रा चार चाकी कार क्र एम. एच. ४०.सि .एस .४५०४ किमती १२,००००० /रू असा एकुण किमती १२,२८,८००/– रू चा मुद्देमाल मिळुन आला. पोस्टे सावनेर येथे आरोपींविरूद्ध कलम ६५(अ), (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि उमेश पाटील, पोउपनि बाळु राठोड, अरूण राठोड, पोहवा रविंद्र भलावी यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**